## शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहीती

## मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, मंत्रालय, मुंबई ४०००३२

### सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

**कार्यालयाची आवश्यकता:-**

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयात निवडणूक संचलन व मंत्रालयीन कामकाजाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी नामिकासूची तयार करावयाची आहे. यास्तव खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. हे अर्ज, सदर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांत, कार्यालयीन वेळेत म्हणजेच सकाळी ०९.४५ वाजेपासून सायंकाळी ०६.१५ वाजे पर्यंत उपरोक्त नमूद कार्यालयीन पत्त्यावर आवश्यक त्या कागदपत्रांसह बंद लिफाप्यात पाठवावेत. विहीत मुदतीत न आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | अवर सचिव ( मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय ) | १. उमेदवार शासकीय सेवेतून अवर सचिव या पदावरून सेवानिवृत्त असावा<br>२. उमेदवारास मंत्रालयीन स्तरावरील कामाचा अनुभव असावा<br>३. निवडणूक संचलन या कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा | १ |

**अटी व शर्ती :**

१. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण २७१५/ प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे

२. उपरोक्त पद हे शासन सेवेतील नियमित पद नाही.

३. या पदावरील भरती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील सुरवातीला १ वर्षाच्या कालावधीसाठी मर्यादीत राहील.

४. सदर पद करार पध्दतीने भरण्यात येईल. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी पदासाठी दावा करता येणार नाही अथवा हा अनुभव ग्राह्य असणार नाही.

५. या पदावर निवड झालेल्या उमेदवारास शासन सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

६. उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या मान्यतेने एक महिन्याची पूर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येतील.

७. सदर पदासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी अर्ज करण्यास पात्र असतील. त्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ मधील तरतुदी नुसार परिश्रामिक देय राहील.

८. इतर अटी व शर्ती नियुक्तीबाबतच्या करारान्वये निश्चित करण्यात येतील.

९. कोणतेही कारण न देता अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचा राहील.

**आपला,**

**( म. रा. पारकर )**
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य**